‘Research Journey’ International Multidisciplinary E- Research Journal
Special Issue I – Emerging Trends & Issues in Research & Development
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015)
ISSN : 2348-7143 (Online)
April-May-June - 2016

# वसाहत काळातील महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर सुधारणांची सुरुवात :समाज व धर्मशास्त्रात अडकलेला सुधारणावाद

**डॉ. संजय तुळशिराम शेलार.**
सहाय्यक प्राध्यापक इतिहास
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,मालेगांव-कॅम्प, नाशिक.

**उद्देश -** वसाहत काळातील महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर समाजसुधारणांची सुरुवात: महाराष्ट्रातील धर्मशास्त्रात अडकलेला सुधारणावादाचा अभ्यास करणे.

**व्याप्ती-** प्रस्तुत शोधनिंबधाची व्याप्ती वसाहत काळातील महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर समाजसुधारणांचा सुरुवातीचा कार्यकाळ.

**मर्यादा-** प्रस्तुत शोधनिनंबधाची वसाहत काळातील महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर समाजसुधारणांची सुरुवात १९ वे शतक.

**संशोधन पध्दती व साधने -** प्रस्तुत शोधनिनंबधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दती समकालीन पत्रे, करार, कोर्टाच्या नोंदी, जणगणना अहवाल, रोजनिशी, आत्मचरित्र, सार्वजनिक अभिलेख व अधिकृत माहितीचे संकलन करुन विश्लेषणात्मक मांडणीचा वापर केला असून वसाहत काळातील समाजसुधारणांची सुरुवात महाराष्ट्रातील धर्मशास्त्रात अडकलेला स्त्री-सुधारणावाद यांची अस्सल प्रकाशित पत्राबरोबरच दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

महाराष्ट्रात भांडवली उद्योग सुरु होण्याच्या काही दशके आधीच नव्या बुध्दिजीवी वर्गाचा उदय होऊ लागला. ब्रिटिश सत्तेच्या अंमलाखाली जागतिक भांडवली अर्थव्यवस्थेशी महाराष्ट्रात जो संबंध जोडला गेला त्यामधून हा बुध्दिजीवींचा वर्ग उदयाला आला. ब्रिटिशांनी लादलेली नवी अर्थव्यवस्था, नवी शासनपध्दती, नवी प्रशासकीय यंत्रणा, पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार यामधून नव्या बुध्दिजीवींचा उदय झाला. नवा बुध्दिजीवी वर्ग महाराष्ट्रात औद्योगिक भांडवलशाही येण्यापूर्वीच भांडवली व्यवस्थेने पुरस्कारलेल्या आधुनिकतेच्या प्रभाखली आला.राजा राममोहन रॉय यांच्या पिढीपासून नवा बुध्दिजीवी वर्ग आधुनिकतेच्या दिशेने विचारप्रवर्तन करु लागला.

महाराष्ट^ात ब्रिटिश सरकारने व मिशनऱ्यांची इंग्रजी शिक्षणाचे धोरण स्वीकारले. इंग्रजी शिक्षणाने व संस्काराने मनुष्याच्या जीवनसरणीत आमूलाग्र बदल घडवून व्यक्तिवादी समाज निर्माण करता येईल या विश्वासातून शिक्षणप्रसाराचा मार्ग अनुसरला. कारकुनाचा वर्ग तयार करण्यासाठी ब्रिटिश सरकारने, तर भारतीय समाजातील पाखंडी धर्मश्रध्दांचा अंधार दूर करुन ख्रिस्ती धर्मज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी मिशनऱ्यांची शाळा काढण्यास सुरुवात केली. व्यक्तीवादी समाज निर्माण करण्याचे ध्येय दोघांनाही समान असल्यामुळे त्यांनी पाश्चात्य इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण स्वीकारले.[१]

पाश्चात्य जगाशी सक्षमता घडलेल्या नव्या बुध्दिजीवींच्या ठायी निर्माण झालेल्या आधुनिकतेच्या प्रेरणा परंपरेच्या चाकोरीमध्ये स्वजातीच्या उन्नतीच्या दिशेने कार्यरत होऊ लागल्या. भारतीय समाजामध्ये जातीबाहेर स्वत:चे स्वत्व प्रस्थापित करणे शक्य नसल्याने जातिअस्मितेच्या रिंगणामध्येच आपल्या व्यक्तिवादी प्रेरणांचा शोध घेण्यास सुरुवात झाली. एका ब्राह्मणाने बायबलमधील वचन उदधृत करुन आत्मिक स्वत्व म्हणजे ब्राह्मणत्व जपण्याचा सल्ला आपल्या जातबंधूना दिला होता. आधुनिकतेच्या कक्षेतून स्वत्व शोधणारे हे नवे बुध्दिजीवी जातिअस्मितेच्या परिघामध्ये स्वत:च्या अस्मितेची उभारणी करत होते,[२] त्याचेच हे उत्तम उदाहरण . तात्पर्य, १९ व्या शतकातील नव्या ब्राह्मणी बुध्दिजीवींनी जातिउन्नतीच्या मार्गानेच आधुनिकतेचा मार्ग चोखाळणे पसंत केले.

आधुनिकतेच्या मूल्यचौकटीतून वसाहतवाद्यांनी हिंदू धर्मातील स्त्रियांची स्थिती व जातिविषमता यांच्यावर टीकास्त्र चालवले होते. विशेषतः व्यभिचारावर बोट ठेवून हिंदू धर्माला हिणवण्याचा प्रयत्न केला होता. जातीच्या जाणिव-नेणिवेमधून आधुनिकतेकडे झुकलेल्या ब्राह्मणी बुध्दिजीवींना जातिविषमतेपेक्षा जातिअभिमानाशी संलग्न असलेला व्यभिचाराचा प्रश्न अधिक भावला. हिंदू धर्माच्या व जातिसंस्थेच्या चर्चेमध्ये, आपली निःपक्षपाती भूमिका टिकवण्याच्या मिषाने सहभागी न होणाऱ्या दर्पणकारांनी घेतली व्यभिचारनिर्मूलनसंदर्भात त्यामुळेच उघड भूमिका घेतली. वेश्यांविरोधी पवित्रा घेऊन त्यांनी वेश्यांमुळे घडणाऱ्या हानीकडे लक्ष वेधले व सुधारणेचा पवित्रा घेतला. वेश्यांची जातीमुळे होणारी गुलामगिरी जातिसंस्थेतील गुलामगिरीपेक्षा अधिक अनिष्ट असून अनिती, अधर्म व व्यसनीपणा वाढीस लागतो असा दावा बाळशास्त्री जांभेकर यांनी केला.

स्त्रियांच्या लैंगिक नियंत्रणामधूनच जातीचे अस्तित्व टिकवण्याचे परंपरागत भान घेऊन नव्या ब्राह्मणांनी बुध्दिजीवींनी 'स्त्रीधर्म', 'स्त्रीस्वभाव' व 'स्त्रीचरित्र' या ब्राह्मणी संज्ञाप्रणालीच्या चाकोरीत स्त्रीशिक्षण व विधवाविवाहाचा पुरस्कार केला. सदविद्येमुळे स्त्रिया पतिपरायण व धर्मपरायण बनून लैंगिक इच्छांचे दमन करतात व वर्णसंकर घडू देत नाहीत या तर्काच्या आधारे ब्राह्मणी बुध्दिजीवींनी स्त्रीशिक्षणाचा आग्रह धरला. स्त्रीशिक्षणाचा आग्रह धरण्यापाठीमागे आधुनिकतेची आसही होती. वसाहतवादी सक्षमतेमधून पाश्चात्य जगातील आधुनिक शिक्षित स्त्रीची प्रतिमाही भुरळ पाडू लागली होती. त्यातूनही स्त्रीशिक्षणाचा आग्रह धरला जाऊ लागला.[३]

१८४१ मध्ये प्रकाशित झालेल्या पुनर्विवाह प्रकरणाच्या प्रस्तावनेमध्ये लेखकाच्या परंपरागत व आधुनिक प्रेरणा व्यक्त झाल्या आहेत. विद्याभ्यास न करण्यास मूळ असे दिसते की, पुस्तके पाहू शकल्या म्हणजे कोकशास्त्रादिक पाहून वाईट चाल करुन बिघडतील, परंतु 'विद्या ददाति विनयं' म्हणून लहानपणापासून सद्विद्यानिती वगैरेचा अभ्यास करविल्यास कधी बिघडणार नाहीत. पहा की, युरोपीयन लोकांमध्ये सर्व स्त्रियांस विद्याभ्यास पुरुषांप्रमाणेच असतो. त्या कोणत्या बिघडल्या? हिंदुस्थानच्या कोण शुध्द आहेत? बरे-वाईट सर्वत्र राहते; परंतु त्यांमध्ये वाईट थोडे, येथे बरे थोडे, हे प्रत्यक्ष सिध्दच आहे आणि एक होते की, त्यांजवळ ह्या गेल्या म्हणजे हंसिनीजवळ बकिनीप्रमाणे होतात.[४] यास्तव विद्याभ्यास जरुर करावावा. युरोपातील आधुनिक स्त्रीच्या लालसेमधून हा स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला जात होता हेच उपरोक्त विवेचनातून स्पष्ट होते.

अशा आधुनिकतेचा ध्यास ब्राह्मणश्रेष्ठतेच्या अभिनिवेशामधून घेतला जात असल्याने, स्त्रीसुधारणांचा पुरस्कार ब्राह्मण जातीची सुधारणा घडवून ब्राह्मणश्रेष्ठतेची प्रस्थापना करण्यासाठीच केला जाऊ लागला. तैलंग ब्राह्मण व परशुरामक्षेत्रस्थ ब्राह्मण यांचे स्त्रीसुधारणेबाबतचे युक्तिवादही ब्राह्मण जातिसुधारणेच्या प्रेरणेनेच भारलेले होते. ब्राह्मणहिताचा तर्क मांडूनच त्यांनी स्त्रीशिक्षण व विधवापुनर्विवाह पुरस्कार केलेला दिसतो.[५]

'आधुनिक स्त्री ' ही युरोपातील उच्चवर्गीय श्रेष्ठत्वाचे व वासाहतिक संदर्भात साम्राज्यवादी श्रेष्ठत्वाचे प्रतिक असल्याने, भारतातील नव्या बुध्दिजीवींना वाटणारे आधुनिक स्त्रीचे आकर्षण वर्गोन्नतीच्या दिशेने वाटचाल करु लागले. म्हणूनच ब्राह्मण जातीची सुधारणा घडवून जातवर्गीयउन्नतीकडे घेऊन जाणाऱ्या स्त्री-सुधारणांचा पुरस्कार करण्यास त्यांनी सुरुवात केली. भारतीय जातिसमाजामध्ये जाती-उतरंडीच्या चौकटीमध्येच वर्गोन्नती शक्य असल्याने, तत्कालीन सुधारणांच्या प्रेरणा प्रायः जातिसुधारणेच्या अंगाने कार्यरत होत होत्या. तैलंग ब्राह्मण व परशुरामक्षेत्रस्थ ब्राह्मण त्याला अपवाद नव्हते. ब्राह्मणजातीच्या हिताचा तर्क मांडूनच

ISSN : 2348-7143 (Online)
April-May-June - 2016

स्त्रीशिक्षण व विधवापुनर्विवाह त्यांनी पुरस्कार केला.[६] परिणामी स्त्रीसुधारणांबाबतचा त्यांचा युक्तिवाद वर्गोन्नतीकडे नेणाऱ्या स्वजातिसुधारणांच्या प्रेरणेनेच भारलेला राहिला.

ऐतिहासिक धर्म म्हणून हिंदू धर्म इतिहासक्रमातून आलेल्या अनेक धर्मश्रध्दांच्या एकत्रित अस्तित्वातून बनला होता. जातिव्यवस्थेत सामील होणाऱ्या अनेक समूहांच्या श्रध्दांना ब्राह्मणी श्रध्देच्या अधिपत्याखाली एकत्र आणण्याचा ब्राह्मणांच्या प्रयत्नांमधून हिंदुधर्माला संग्राहक रुप प्राप्त होत गेले. जातिव्यवस्थेच्या विरोधात वेळोवेळी जे धार्मिक संघर्ष झाले त्यांचाही हिंदुधर्माच्या ठायी समन्वय घडवण्यात आला. ब्राह्मणी वर्चस्व व जातिव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ब्राह्मणी धर्माने धर्मश्रध्देमध्ये जे बदल घडवून आणले, ते धर्मबदलही हिंदुधर्माच्या ठायी संकलित झाले. जातिव्यवस्थेची उतरंड टिकवण्यासाठी ब्राह्मणी धर्मश्रध्देचे समन्वय जसे चालू होते, तसे जातिव्यवस्थापक विषमतेला आव्हान देण्यासाठीही खालच्या जातींमधून श्रध्दासमन्वय चालले होते. मध्ययुगात भारतात दाखल झालेल्या मुस्लिम धर्मश्रध्देलाही निम्नजातीयांनी जातिव्यवस्थाविरोधी बाण्यातून स्वसमूहांच्या श्रध्दांशी समन्वित करुन आत्मसात केले होते. भारतात कार्यरत असलेल्या या जातिव्यवस्थासमर्थक व जातिव्यवस्थेविरोधी धर्मश्रध्दांच्या समन्वयप्रक्रियेने हिंदुधर्माला संग्राहक, व्यामिश्र व गठडीचे स्वरुप प्रदान केले होते.[७]

वसाहतवादी वर्चस्वी मनोवृत्तीतून भारतविद्याविशारदांनी आर्यांच्या वैदिक ब्राह्मणी बारश्याचे गुणगान केले. प्राचीन भारतातील समग्र कर्तृत्वाला आर्य ब्राह्मणांचे कर्तृत्व मानले. ब्राह्मण बुध्दिजीवींना तो स्वजातीचा गौरव वाटला. त्यामुळेच भारतविद्याविशारदांच्या या वंशाधारित संस्कृतिमीमांसेला त्यांनी विलक्षण आत्मीयतेने निष्ठा बहाल केल्या. वसाहतवादी व ब्राह्मणी बुध्दिजीवींची अशी युती हितसंबंधांच्या ऐक्यातून घडत होती. वसाहतवादी सत्तेचा अंमल प्रस्थापित करण्यासाठी भारतविद्याविशारदांनी ब्राह्मणी धर्मशास्त्रप्रणीत हिंदू कायदा सर्वंकष स्वरुपात सर्व हिंदूंवर लादण्यासाठी तयार केला, तर नव्या संदर्भात ब्राह्मणेत्तर जातींच्या अधिकारांची स्वायत्त बेटे मोडून काढणारी, सर्वंकष पितृसत्ताक ब्राह्मणी व्यवस्थेच्या अधीन करणारी धर्मशास्त्रप्रामाण्याची भूमिका ब्राह्मण स्वजातीवर्चस्वाला अनुकूल होती. ब्राह्मणी संस्कृत ग्रंथांच्या आधारे हिंदुधर्म कायदा व हिंदुधर्म संकल्पना गठित करणे, ब्राह्मणी परंपरेशीही सुसंगत होते. अशा प्रकारे ब्राह्मणी परंपरेचा वारसा व . वसाहतवादी सत्तेची प्रतिष्ठा मिळालेला शास्त्रप्रामाण्यवादी तर्क ब्राह्मण जातीच्या परिघामध्येच सुधारणांचा विचार करणाऱ्या नव्या ब्राह्मणी बुध्दिजीवींना आपलासा वाटला. महाराष्ट्रीय समाजात सुधारणा घडवण्यासाठीही नव्या ब्राह्मणी बुध्दिजीवींचे धुरीण म्हणून बाळशास्त्री जांभेकर यांनी शास्त्रप्रामाण्यवादाचा आश्रय घेऊन श्रीपत शेषाद्रीला शुध्द करुन घेण्याचा प्रयत्न केला.[८]

**सारांश**

ब्रिटिशांच्या व्यापारवादी (मुक्त व्यापारवादी) धोरणातून निर्माण झालेल्या अर्थरचनेची व प्रशासकीय यंत्रणेची गरज भागविण्यासाठी महाराष्ट^ात नवा बुध्दिजीवी वर्ग उदयाला येऊ लागला. मुंबईतील आर्थिक उलाढालीमुळे आघाडीवर असलेले इंग्रजी जाणणारे व्यापारी लोक, त्यांना मदतकारी ठरणारे इंग्रजीशिक्षित बुध्दिजीवी जातीतील लोक, प्रशासनव्यवस्था,न्यायव्यवस्था आणि शिक्षणव्यवस्था यामध्ये कार्यरत असलेले उच्चभ्रू जातीतील इंग्रजीशिक्षित लोक बुध्दिजीवी वर्गाचा भाग बनत होते. त्यामुळे महाराष्ट्रातील नव्या बुध्दिजीवी वर्गाला प्राय: इंग्रजीशिक्षित बुध्दिजीवीवर्ग असे स्वरुप प्राप्त होत गेले.

१९ व्या शतकात वर्गीय समाजाबदलच्या संदर्भात वर्गोन्नती व जातीउन्नतीच्या प्रक्रियानी शुध्दीच्या क्षेत्राच्या स्पर्धेचा जन्म झाला या जातीय पार्श्वभूमीवर जातीउन्नतीच्या उद्देशाने प्रभू, सोनार वगैरे जातींनी, जर जातीश्रेष्ठत्व टिकवण्याच्या उद्देशाने ब्राह्मणजातसमूहाने श्रीपत शेषाद्रीच्या शुध्दीकरणाला कडजाडून विरोध केला. विरोधापुढे शास्त्रप्रामाण्यवादी चौकटीतून ब्राह्मण जातिसुधारणा करण्याला माघार घ्यावी लागली. व जातितव्यवस्थेला समुदाय सत्तेसमोर शास्त्रप्रामाण्यवादी सुधारणांना पराभूत व्हावे लागले.

**संदर्भ**

१. दि टाइम्स ऑफ इंडिया २३.३.१८३५
२. शिंदे श्रीपतराव: विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदे, मुंबई, १९७३, पृ.१५.
३. जांभेकर ग.गं. (संपा.): आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड ३, पुणे, १९५०.
४. मालशे स.गं. आपटे नंदा,: विधवा विवाह चळवळ १८००-१९००, अनमोल प्रकाशन, मुंबई, १९७८,
५. फडके य.दि.(संपा): महात्मा फुले समग्र वाङ्मय, ४ थी आवृत्ती, महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, पुणे, १९९१.
६. मालशे स.गं. आपटे नंदा,: विधवा विवाह चळवळ १८००-१९००, अनमोल प्रकाशन, मुंबई, १९७८,
७. कित्ता
८. जांभेकर ग.गं. (संपा.): आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड ३, पुणे, १९५०.

RESEARCH JOURNEY